
पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक १५९ ■ मंगळवार, दि. १६ डिसेंबर २०२५ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.-MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 ■ Email: citynewss80@gmail.com

RRC NEWS
@RRCDIGITALAKOLA
RRC NEWS
पाहण्यासाठी
QR कोड स्कॅन करा !
ओपन, लाईक, सबस्क्राईब करा



# अमरावती शहर गुन्हेशाखेकडून अवैधरित्या मॅफेड्रॉनची विक्री करणारे इसम ताब्यात

प्रतिनिधी १६ डिसेंबर



**अमरावती** : अमरावती शहर गुन्हेशाखे कडुन अवैधरित्या मॅफेड्रॉन (एम.डी.) ची विक्री करणा-या इसमांना ताब्यात घेऊन ६,१०,०००/- रू चा मुददेमाल जप्त अमरावती शहर गुन्हे शाखेला यश आले आहे.

पोलीस आयुक्त यांनी अमरावती शहरातील अवैधरित्या अंमली पदार्थ विकी, करणाऱ्या इसमांवर प्रभावी कार्यवाही करण्याबाबत आदेश प्राप्त झालेवरून पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण, गुन्हे शाखा अमरावती शहर यांचे नेतृत्वात पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदार नेमुन खालील प्रमाणे कार्यवाही केली.

. १५/१२/२०२५ रोजी गुन्हेशाखा चे पथक हे आयुक्तालय हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना पेट्रोलींग दरम्यान गुप्त बातमीदाराकडुन खात्री लायक माहीती मिळाली की, बाबा उर्फ जमीर रा. गवळीपुरा अमरावती व त्याचे सोबत आसीम खान नावाचा एक मुलगा असे त्यापैकी बाबा उर्फ जमीर याने पांढरे शर्ट व काळे पॅन्ट असे कपडे घातले असुन आसीम खान याने पांढ-या कथीया रंगाचे टी शर्ट व काळया रंगाचे लोअर पॅन्ट घातली हे दोन्ही इसम आपले जवळ अवैध्यरित्या मेथेंडॉन (एम.डी.) नावाचा अंमली पदार्थ बाळगुण विक्री करण्याचे इरादयाने त्याचे ताब्यातील कथीया रंगाची अॅक्टीवा गाडी क्र. एम.एच ३१ एफ एम. ३७४० ने लालखडी रिंग रोड येथे येणार आहे अशा मिळालेल्या माहीतीवरून पो. नि. संदिप चव्हाण यांचे नेतृत्वात गुन्हे शाखेच्या पथकाने नमूद ठिकाणी सापळा रचुन मोठ्या शिताफीने दोन्ही इसमांना ताब्यात घेतले. त्यांचे ताब्यातून ५२ ग्रॅम निव्वळ एम.डी. अंमली पदार्थ व इतर साहीत्य असा एकूण ६,१०,०००/- रू चा मुददेमाल जप्त करून ताब्यात घेतला. ताब्यात घेतलेल्या आरोपींना सदर माला बाबत विचारपुस केली असता त्यांनी सदरचा अंमली पदार्थ माल हा १) शेख राजा शेख रहीम उर्फ होंगा रा. गवळी पुरा अमरावती २) शेख सोनू शेख रहीम उर्फ होंगा रा. गवळी पुरा अमरावती ३) शेख फईम शेख रहीम उर्फ हूंगा शेख आमद रा. गवळी पुरा अमरावती ४) शेख रहीम उर्फ हुंगा

## ♦ ६ लाख १० हजारांचा मुद्देमाल जप्त

शेख आमद रा. गवळी पुरा अमरावती यांचे मालकीचा असल्याचे सांगीतले. नमुद आरोपीतां विरुध्द पोलीस स्टेशन नागपुरी गेट येथे एन.डी.पी.एस. अॅक्ट प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपींचे नावे शेख जमीर उर्फ बाबा शेख आमद वय ३९ वर्ष रा. गवळी पुरा रतनगंज मस्जीद जवळ अमरावती, एक विधी संघर्ष बालक यांना ताब्यात घेतली असून फरार आरोपींचे नावे शेख राजा शेख रहीम उर्फ होंगा रा. गवळी पुरा अमरावती ,शेख सोनू शेख रहीम उर्फ होंगा रा. गवळी पुरा अमरावती,) शेख फईम शेख रहीम उर्फ हूंगा शेख आमद रा. गवळी पुरा अमरावती शेख रहीम उर्फ हुंगा शेख आमद रा. गवळी पुरा अमरावती आहे. नमुद अटक आरोपींनी सदरची एम.डी. ही कोणाकडून खरेदी केली तसेच सदर ची एम.डी ही अमरावती शहरातध्ये कोठून आली याबाबत सविस्तर तपास गुन्हे शाखा यांचे मार्फत सुरू असून त्यांनाही लवकरच अटक करण्यात येईल तसेच अमरावती शहरात एम.डी. बाळगणारे त्याचे सेवन करणारे, विक्री करणारे यांचेबाबत गोपनिय माहीती काढण्यात आली असून त्यांच्यावरही नजीकच्या काळात धडक मोहीम राबविण्याबाबत. आयुक्त अमरावती शहर यांनी आदेशीत केले आहे. सदर ची कारवाई . पोलीस आयुक्त . अरविंद चावरिया साहेब अमरावती शहर, पोलीस उपायुक्त श्री गणेश शिंदे , पोलीस उपायुक्त . श्याम घुगे साहेब, पोलीस उपायुक्त मुख्यालय तथा गुन्हे श्री रमेश धुमाळ, शिवाजी बचाटे , सपोआ गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखा चे पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांच्या नेतृत्वात सपोनि महेश इंगोले, पोउपनि गजानन सोनुने, पोलीस अंमलदार दिपक सुंदरकर, गजानन ढेवले, मनोज ठोसर, मंगेश परिमल, सुधीर गुडधे, संदिप खंडारे, नईम बेग, विकास गुडदे, सागर ठाकरे, राजीक रायलीवाले, सुरज चव्हाण, प्रभात पोकळे यांनी केली आहे.

# शेतकऱ्यांना ई-केवायसी करण्याचे आवाहन

प्रतिनिधी १६ डिसेंबर

## ♦ ई-केवायसीअभावी मदतीस विलंब

**अमरावती** : अतिवृष्टी आणि नैसर्गिक आपत्तीने बाधित शेतकऱ्यांच्या ई-केवायसीअभावी मदतीची रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होण्यास विलंब होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी तातडीने ई-केवायसी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे.

गेल्या वर्षभरात ५ लाख ९४ हजार ५४५ शेतकऱ्यांना मदतीपोटी जिल्ह्याला ५५६ कोटी ८३ लाख रूपयांची मदत प्राप्त झाली आहे. अतिवृष्टी आणि नैसर्गिक आपत्तीने बाधित ४३ हजार २९३ शेतकऱ्यांच्या ई-केवायसीअभावी ४० कोटी ६७ लाख रूपयांची मदत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होण्यास विलंब होत आहे. त्यामुळे मदतीची रक्कम बँक खात्यात जमा होण्यासाठी शेतकऱ्यांनी ई-केवायसी करणे आवश्यक आहे. अमरावती तालुक्यातील ४ हजार ५३९ शेतकऱ्यांचे २ कोटी ७९ लाख रूपये, तिवसा तालुक्यातील २ हजार ७६५ शेतकऱ्यांचे २ कोटी ६४ लाख, भातकुली तालुक्यातील ४ हजार २२४ शेतकऱ्यांचे २ कोटी ४७ लाख, चांदुररेल्वे तालुक्यातील ३ हजार ५४० शेतकऱ्यांचे २ कोटी ६१ लाख, धामणगाव रेल्वे तालुक्यातील ३ हजार ८७५ शेतकऱ्यांचे २ कोटी ६९ लाख, नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील ३ हजार ३०५ शेतकऱ्यांचे २ कोटी ८३ लाख, अचलपूर तालुक्यातील ३ हजार ८८५ शेतकऱ्यांचे ४ कोटी ५९ लाख, चांदुरबाजार तालुक्यातील २ हजार ५८९ शेतकऱ्यांचे २ कोटी ६४ लाख, मोर्शी तालुक्यातील २ हजार २३ शेतकऱ्यांचे २ कोटी ५० लाख, वरूड तालुक्यातील १ हजार ६४२ शेतकऱ्यांचे ४ कोटी ८० लाख, दर्यापूर तालुक्यातील ४ हजार ७०७ शेतकऱ्यांचे ३ कोटी ४४ लाख, अंजनगाव सुर्जी तालुक्यातील २ हजार १४० शेतकऱ्यांचे २ कोटी २२ लाख, धारणी तालुक्यातील २ हजार ८६६ शेतकऱ्यांचे ३ कोटी ५ लाख, चिखलदरा तालुक्यातील १ हजार १९३ शेतकऱ्यांचे १ कोटी ३४ लाख रूपये ई-केवासीअभावी प्रलंबित आहेत. जिल्ह्यातील लाभार्थी शेतकऱ्यांची ई-केवायसी पूर्ण होत नसल्याने निधीच्या वितरणात अडचण येत आहे. जिल्हास्तरावर अंमलबजावणी समाधानकारक दिसत असली तरी ई-केवायसी करून निधी वितरणाची टक्केवारी वाढवण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहे. शेतकऱ्यांनी आधारकार्डसह नजिकच्या आधार सेवा केंद्राला भेट देवून तातडीने ई-केवायसी करावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# आरोपीकडून चाकू जप्त

प्रतिनिधी १६ डिसेंबर

**अमरावती** : १५/१२/२०२५ रोजी राजापेठ हद्दीत अमरावती शहर गुन्हे शाखेचे पथक पेट्रोलिंग करीत असताना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली चिंचफैल येथे इसम युवराज उर्फ जय विजय कुरवाने वय २५ वर्ष रा चिंचफैल अमरावती हा हातात लोखंडी चाकू घेऊन फिरत आहे.



त्याला त्याब्यात घेऊन त्याच्याकडून चाकू जप्त करून पुढील कारवाहीसाठी पो स्टे राजापेठ येथे कलम ४/२५, सह कलम १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात येत आहे.

# भाजीबाजार चौकात चाकुने भोसकुन गृहस्थाचा खून

## ♦ दोन हल्लेखोरांनी पकडून केले चाकुने वार, दोन संशयित चौकशीसाठी

प्रतिनिधी १६ डिसेंबर

**अमरावती** : येथील भाजीबाजार चौकात एका ४५ वर्षीय व्यक्तीचा चाकुने भोसकून निघृण खून करण्यात आला. सोमवारी रात्री ८ ते ८.१५ वाजताच्या सुमारास ही घटना घडली. पवन पंजाबराव वानखडे (४५, रा. खरकाडीपुरा, अमरावती) असे मृताचे नाव आहे.

जुन्या वैमनस्यातून हा खून करण्यात आला असावा, अशी शक्यता पोलिसांनी वर्तविली. घटनास्थळी पोलिस उपायुक्त श्याम घुगे, सहायक पोलिस आयुक्त संजय खताळे, गुन्हे शाखा प्रमुख संदीप चव्हान व खोलापुरी गेटचे ठाणेदार दिलिप वडगावकर यांनी भेट दिली. तथा मृतदेह जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविला. डॉक्टरांनी तपासून पवन वानखडे यांना मृत घोषित केले. पोलिस सुत्रानुसार, मारेकऱ्यांचा पवन वानखडे यांच्या मुलाशी वाद होता. आरोपींना समजावण्यासाठी पवन वानखडे हे चिंचफैल भागातून भाजीबाजार येथे गेले होते. तेथे पवन वानखडे व त्यांच्यात वाद झाला. वादा पर्यावसन हल्ल्यात होऊन पवन यांच्यावर चाकुने वार करण्यात आले, अशी माहिती समोर आली आहे. खोलापुरी गेट व गुन्हे शाखेचे पथक मारेकऱ्यांच्या मागावर आहेत. माहितीनुसार, पवन वानखडे हे सोमवरी रात्री ८ च्या सुमारास भाजीबाजार चौक असताना अज्ञात तीन ते हल्लेखोरांनी त्यांच्यावर हल्ला चढवित त्यांच्या गळ्यावर व हनुवटीवर वार करण्यात आले. त्यांना रक्तबंब स्थितीत टाकून मारेकऱ्यांनी पळ काढल अतिरक्तस्त्रावामुळे पवन वानखडे यां घटनास्थळीच मृत्यू झाला. या घटनेम् हादरलेल्या स्थानिक दुकानदारांनी दुकाने बंद केली होती.

# गणेशपूर येथे शेतकऱ्याची आत्महत्या

प्रतिनिधी १६ डिसेंबर

**खामगाव** : तालुक्यातील गणेशपूर येथे गोपाल नामदेव सुरडकर (५२) या शेतकऱ्याने रात्री राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली. याप्रकरणी हिवरखेड पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, श्रीकृष्ण श्रीराम निवल (४८, रा. गणेशपूर) यांनी दिलेल्या माहितीनुसार, मृतकाने दोरीच्या सहाय्याने घरात गळफास घेतला होता. घटनेची माहिती मिळताच नातेवाइकांनी घटनास्थळी धाव घेतली. नातेवाइकांनी घटनास्थळी पाहणी केली असता मृतक कोणतीही हालचाल करत नसल्याचे आढळून आले. प्राथमिक माहितीनुसार, काही वर्षापूर्वी झालेल्या रस्ते अपघातानंतर मृतकाला शारीरिक त्रास होत असल्याने त्यातून नैराश्य येऊन त्याने आत्महत्या केल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे; मात्र मृत्यूबाबत कोणावरही संशय व्यक्त करण्यात आलेला नाही. प्रकरणाचा तपास हिवरखेड पोलिस ठाण्याचे पोलिस हेडकॉन्स्टेबल प्रवीण जाधव करीत आहे.

# अमरावती महानगरपालिका निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवारांच्या मुलाखतींचे आयोजन

प्रतिनिधी १६ डिसेंबर

**अमरावती** : शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटीच्यावतीने अमरावती महानगरपालिका निवडणुकी २०२६ साठी शहरातील विविध प्रभागांतून इच्छुक उमेदवारांनी सादर केलेल्या अर्जांच्या आधारे मुलाखतींचे आयोजन करण्यात आले आहे. या मुलाखती गुरुवार,दिनांक १८ डिसेंबर २०२५ आणि शुक्रवार, दिनांक १९ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११:०० वाजल्यापासून सुरू होतील. इच्छुक सर्व उमेदवारांना आपापल्या प्रभागानुसार निश्चित वेळेनुसार मुलाखतीस उपस्थित राहावे लागणार आहे.

## ♦ अमरावती शहर जिल्हा काँग्रेस कमिटी

**इच्छुक सर्व उमेदवारांना विनंती आहे की, त्यांनी आपल्या प्रभागानुसार निश्चित केलेल्या वेळेनुसार वेळेआधीच उपस्थित राहावे.**

◆गुरुवार, दिनांक १८ डिसेंबर २०२५ (सकाळी ११:०० ते संध्याकाळी ४:०० वाजता

प्रभाग क्रमांक ३ - नवसारी
प्रभाग क्रमांक ४ - जमील कॉलनी-लालखडी
प्रभाग क्रमांक ५ - महेंद्र कॉलनी-न्यू कॉटन मार्केट
प्रभाग क्रमांक ६ - विलास नगर-मोरबाग
प्रभाग क्रमांक ८ - जोग स्टेडियम-चपरासीपुरा
प्रभाग क्रमांक ११ - फ्रेजरपुरा-रुक्मिणी नगर
प्रभाग क्रमांक १४ - जवाहर गेट-बुधवारा
प्रभाग क्रमांक १५ - छाया नगर-गवळीपुरा
प्रभाग क्रमांक १६ - अलीम नगर-रहेमत नगर
प्रभाग क्रमांक २१ - जुनी वस्ती, बडनेरा
प्रभाग क्रमांक २२ - नवी वस्ती, बडनेरा

◆शुक्रवार, दिनांक १९ डिसेंबर २०२५ (सकाळी ११:०० ते संध्याकाळी ४:०० वाजता)

प्रभाग क्रमांक १ - शेगाव-रहाटगाव
प्रभाग क्रमांक २ - संत गाडगे बाबा-झञ्श्ण
प्रभाग क्रमांक ७ - जवाहर स्टेडियम
प्रभाग क्रमांक ९ - वडाळी-ऐंझ
प्रभाग क्रमांक १० - बेनोडा, भीमटेकडी-दस्तुर नगर
प्रभाग क्रमांक १२ - स्वामी विवेकानंद कॉलनी-बेलपुरा
प्रभाग क्रमांक १३ - अंबापेठ-गौरक्षण
प्रभाग क्रमांक १७ - गडगडेश्वर-रवी नगर
प्रभाग क्रमांक १८ - राजापेठ-संत कंवरराम
प्रभाग क्रमांक १९ - साई नगर-अकोली
प्रभाग क्रमांक २० - सूतगिरणी-सामरा नगर

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या मार्गदर्शनानुसार, मुलाखती घेण्यासाठी एक 'पार्लिमेंटरी बोर्ड' स्थापन करण्यात आले आहे.यामध्ये प्रामुख्याने शहर काँग्रेस अध्यक्ष बबलु शेखावत, सदस्यांमध्ये प्रभारी डॉ.झीशान हुसैन,खासदार बळवंत वानखडे,माजी पालकमंत्री श्रीमती यशोमतीताई ठाकूर,माजी पालकमंत्री डॉ.सुनील देशमुख,माजी महापौर विलास इंगोले, माजी महापौर मिलिंद चिमोटे, दिलीप एडतकर,भैय्या पवार,किशोर बोरकर,आसिफ तवक्कल, नजीर खान बी.के.,शहर महिला अध्यक्षा जयश्रीताई वानखडे,निलेश गुहे,वैभव देशमुख,अब्दुल रफीक पत्रकार,संकेत साहू यांचा समावेश राहणार आहे. हे बोर्ड सर्व इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेऊन, पक्षाच्या मूल्यांनुसार योग्य, समर्पित आणि जनतेच्या हिताचे रक्षण करणाऱ्या उमेदवारांची निवड करेल.या पारदर्शक प्रक्रियेद्वारे भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष अमरावती शहराच्या सर्वांगीण विकासासाठी मजबूत, समावेशक आणि न्यायपूर्ण नेतृत्व प्रदान करण्याच्या दिशेने पावले उचलेल.भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष नेहमीच समता, न्याय, धर्मनिरपेक्षता, सामाजिक समरसता आणि गरीब-कष्टकरी-शेतकरी-महिला-युवकांच्या हितांचे रक्षण करण्यासाठी कटिबद्ध राहिला आहे. अमरावती महानगरपालिका निवडणुकीत पक्ष शहरातील नागरिकांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील राहील. पक्षाचे नेते व कार्यकर्ते पाणीपुरवठा, रस्ते व पायाभूत सुविधांचा विकास, दर्जेदार शिक्षण, आरोग्य सेवा, स्वच्छता, पर्यावरण संरक्षण, महिला सशक्तीकरण, युवकांसाठी रोजगार आणि गरीब-वंचित घटकांसाठी न्यायपूर्ण योजना यावर विशेष लक्ष केंद्रित करून एक मजबूत व्यासपीठ तयार करत आहेत.या मुलाखतींमधून निवडले जाणारे उमेदवार काँग्रेस पक्षाच्या धर्मनिरपेक्ष, समावेशक आणि विकासाभिमुख धोरणांना अनुरूप असतील. ते शहरातील सर्व समाजघटकांच्या हितांचे रक्षण करून अमरावतीला एक आदर्श, समृद्ध आणि न्यायपूर्ण शहर बनवतील.




# सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ

मंगळवार, दि. १६ डिसेंबर २०२५


## मारेगाव पोड शिवारात वाघाच्या हल्ल्यात वासरु ठार

प्रतिनिधी १६ डिसेंबर

**कळंब** : कळंब तालुक्यातील डोंगराळ भागात असलेल्या मारेगाव पोड शिवारात जंगलालगत गुरे चारत असताना वाघाने केलेल्या हल्ल्यात एका शेतकऱ्याचे वासरू ठार झाल्याची घटना सोमवारी (१५ डिसेंबर २०२५) सकाळी सुमारे सात वाजण्याच्या सुमारास घडली.

मारेगाव पोड येथील महिला शेतकरी सुमनबाई नारायण शिंदे (वय ५०) या नेहमीप्रमाणे आपली गुरे चारण्यासाठी जंगलालगतच्या शिवारात गेल्या असता, दबा धरून बसलेल्या वाघाने अचानक झडप घालून वासराला ठार केले.

घटनेत शेतकऱ्यांचे सुमारे २० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. शिंदे यांनी आरडाओरड केली; मात्र वाघाच्या भीतीमुळे वासराला त्याच्या तावडीतून सोडवणे शक्य झाले नाही. या परिसरात यापूर्वीही वाघाच्या हल्ल्यात शेळ्या, कालवडी तसेच इतर जनावरे ठार झाल्याच्या अनेक घटना घडल्या असून, त्यामुळे शेतकरी व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

# प्रचाराला उरले चारच दिवस; उमेदवारांचा ‘हायटेक’ फॉर्म्युला

प्रतिनिधी १६ डिसेंबर

### नगरपरिषद निवडणुक

**यवतमाळ** : नगरपरिषद निवडणुकीच्या प्रचाराला आता अवघे चार दिवस शिल्लक राहिले असून, उमेदवार व राजकीय पक्षांनी प्रचाराचा वेग वाढवला आहे. दरम्यान, राज्य निवडणूक आयोगाच्या सुधारित निर्देशांनुसार जाहीर प्रचाराचा कालावधी मतदानाच्या आदल्या दिवशी रात्री दहा वाजेपर्यंतच मर्यादित ठेवण्यात आला आहे. त्यामुळे २० तारखेला मतदान होणार असल्याने १९ तारखेला रात्री १० वाजता सर्व प्रकारचा जाहीर प्रचार बंद करावा लागणार आहे.

या वेळेनंतर सभा, मोर्चे, मिरवणुका तसेच ध्वनिक्षेपकांचा वापर करता येणार नाही. याशिवाय निवडणूक प्रचाराशी संबंधित छापील, इलेक्ट्रॉनिक तसेच सोशल मीडियावरील जाहिरात, प्रसिद्धी व प्रसारणही पूर्णतः बंद राहणार आहे. या आदेशांचे काटेकोर पालन करणे सर्व उमेदवार, राजकीय पक्ष व कार्यकर्त्यांवर बंधनकारक असून, नियमभंग झाल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. प्रचारासाठी उपलब्ध कालावधी मर्यादित असल्याने उमेदवारांकडून हायटेक प्रचाराच्या नव्या पद्धती वापरण्यात येत आहेत. विशेषतः नगराध्यक्षपदाच्या उमेदवारांनी थेट मतदारांच्या मोबाईलवर रेकॉर्ड केलेले व्हॉईस कॉल पाठवून संपर्क साधण्याचा मार्ग स्वीकारला आहे. या कॉलद्वारे उमेदवार स्वतःची ओळख करून देत विकासाचे मुद्दे, आगामी आराखडे तसेच मतदारांकडे मतदानाचे आवाहन करत असल्याचे चित्र दिसून येत आहे. नगरपरिषद क्षेत्रातील मतदारसंख्या मोठी असल्याने, कमी वेळेत प्रत्येक मतदारापर्यंत प्रत्यक्ष पोहोचणे शक्य होत नसल्याची उमेदवारांची अडचण आहे.

त्यामुळे प्रचाराच्या पारंपरिक पद्धतींबरोबरच डिजिटल व तंत्रज्ञानाधारित माध्यमांचा अधिक वापर सुरू झाला आहे. मोबाईल व्हॉईस कॉल, व्हिडिओ संदेश, व्हॉट्सॲप ग्रुप, एसएमएस तसेच सोशल मीडिया प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न सुरू आहे.



दरम्यान, जाहीर प्रचारावर निर्बंध लागू होणार असल्याने उमेदवारांनी प्रचाराची रणनीती बदलली आहे. सकाळी आणि सायंकाळी प्रभागनिहाय छोट्या बैठका, घराघरांत जाऊन संपर्क, तसेच वैयक्तिक भेटी यावर भर दिला जात आहे. प्रचाराचा वेळ कमी असल्याने उमेदवार व कार्यकर्त्यांची धावपळ वाढली असून, शहरातील राजकीय वातावरण तापले आहे. निवडणूक आयोगाच्या नियमांनुसार प्रचाराच्या अखेरच्या टप्प्यात कोणताही नियमभंग होऊ नये, यासाठी प्रशासनाकडूनही कडक नजर ठेवण्यात येत आहे.

> ■ ध्वनिक्षेपकांचा वापर, वाहनांवरील प्रचार, तसेच सोशल मीडियावरील जाहिरातींवर लक्ष ठेवण्यासाठी स्वतंत्र पथके नियुक्त करण्यात आली आहेत. एकूणच नगरपरिषद निवडणुकीचा प्रचार निर्णायक टप्प्यात पोहोचला असून, पारंपरिक प्रचारासोबतच हायटेक प्रचारामुळे यावेळी निवडणूक वातावरण अधिक रंगतदार झाले आहे. आता उरलेल्या चार दिवसांत मतदारांचा कौल कुणाच्या पारड्यात झुकतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## अल्पसंख्याक हक्क दिन प्रभावीपणे साजरा करा

### जैनुल सिद्दीकी यांची मागणी

प्रतिनिधी १६ डिसेंबर

**पुसद** : येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयात शनिवारी अल्पसंख्याक समाजाच्या कार्यकर्त्यांनी भेट देऊन जिल्हाधिकारी, यवतमाळ यांना निवेदन सादर केले. १८ डिसेंबर हा राष्ट्रीय अल्पसंख्याक हक्क दिन इतर राष्ट्रीय दिवसांप्रमाणे प्रभावीपणे व व्यापक स्वरूपात साजरा करण्यात यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

शासनाकडून गेल्या अनेक वर्षांपासून १८ डिसेंबर हा राष्ट्रीय अल्पसंख्याक हक्क दिन म्हणून साजरा करण्यात येतो. मात्र निधीची “आधी खर्च, नंतर परतावा” ही पद्धत असल्याने कार्यक्रम अत्यंत मर्यादित स्वरूपातच होतात. त्यामुळे या दिनाचे महत्त्व अपेक्षित पातळीवर समाजापर्यंत पोहोचत नाही.

हा दिवस व्यापक प्रमाणात साजरा करून प्रशासन व सर्व समाज घटकांमध्ये समतोल, सामाजिक सलोखा, भाईचारा व राष्ट्रीय एकात्मता वृद्धिंगत करणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. तसेच केंद्र, राज्य व जिल्हा परिषदेच्या माध्यमातून अल्पसंख्याक समाजासाठी राबविण्यात येणाऱ्या शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक व आर्थिक योजनांचा लाभ प्रत्यक्षात तळागाळातील घटकांपर्यंत पोहोचावा, अशीही मागणी करण्यात आली.

या मागणीसाठी जिल्हा परिषद माजी सदस्य जैनुल सिद्दीकी, शेंबाळपिंपरी ग्रामपंचायत सरपंच रविंद्र महल्ले, शेतकरी संघर्ष समिती अध्यक्ष रामकृष्ण चंदेल, सामाजिक कार्यकर्ते बापुराव कांबळे, सय्यद दिवानभाई व विजय मनवर उपस्थित होते.

## ६५ गोवंशाची सुटका, चार आरोपींना अटक

### दोन ट्रक जप्त; एलसीबीची कारवाई

प्रतिनिधी १६ डिसेंबर

■ **यवतमाळ** : जिल्ह्यातील स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने नागपूर-हैदराबाद महामार्गावर मोठी कारवाई करत गोवंशीय बैलांच्या अवैध वाहतुकीचा भंडाफोड़ केला आहे. १५ डिसेंबर रोजी रात्री सापळा रचून दोन ट्रक ताब्यात घेण्यात आले. यातून ६५ जिवंत बैलांची सुखरुप सुटका करण्यात आली, तर एक बैल मृतावस्थेत आढळला. पोलिसांनी चार आरोपींना अटक केली असून, मुख्य आरोपी फरार होण्यात यशस्वी झाला आहे.

गोपनीय माहितीच्या आधारावर स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पांढरकवडा परिसरात गस्त घालत असताना ट्रक क्रमांक एमएच ४० बीवाय ०९५१ आणि एमपी ०४ एचई ३५१५ मध्ये कत्तलीसाठी गोवंशीय जनावरे नेण्यात येत असल्याची खात्री झाली. पथकाने सिठोडा गावाजवळ आणि नंतर भारत पेट्रोल पंपाजवळील पार्किंगमध्ये सापळा रचला. तेथे ट्रक लपवलेले आढळले.

ट्रकची झडती घेतली असता जनावरे दाटीवाटीने कोंडून, चारापाण्याची कोणतीही व्यवस्था न करता क्रूरपणे भरलेली होती. जनावरे हैदराबादला कत्तलीसाठी नेत असल्याचे आरोपींनी कबूल केले. ताब्यात घेण्यात आलेले चार आरोपी हे नागपूरचे रहिवासी असून मुख्य सूत्रधार वकार कुरेशी फरार आहे. नाशेख शहनवाज शेख महेबुब (वय ३९), शेख अरबाज शेख कलीम (वय २५), मोहम्मद नसरुद्दीन दुरशादीन कुरेशी (वय २८), मोहम्मद हसन रोशन अंसारी (वय २६) या चार



आरोपींना अटक केली आहे. सुटका केलेले ६५ बैल वैद्यकीय तपासणीनंतर गोकुलम गोसंरक्षण संस्था, पाहापळ (ता. केळापूर) येथे चारापाणी व उपचारासाठी हलवण्यात आले. जप्त मुद्देमालाची एकूण किंमत ३० लाख रुपये (जनावरे ९.८० लाख, ट्रक व इतर) आहे. वडकी पोलीस ठाण्यात प्राणी निर्दयता प्रतिबंधक कायदा, महाराष्ट्र गोवंश हत्याबंदी कायदा व भारतीय न्याय संहितेच्या कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चित्ता व अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक सतिश चवरे यांच्या नेतृत्वाखाली सपोनि दत्ता पेंडकर, पोउपनि धनराज हाके, सुनिल खंडागळे, सुधिर पांडे, निलेश निमकर, सुधिर पिदुरकर, रजनिकांत मडावी, सलमान शेख यांनी केली.

## अंमली पदार्थांची तस्करी : पाच जण ताब्यात

### स्थानिक गुन्हे शाखा व पुसद ग्रामीण पोलिसांची कारवाई

प्रतिनिधी १६ डिसेंबर

**यवतमाळ** : जिल्ह्यात अंमली पदार्थांच्या तस्करीला चाप बसावा यासाठी पोलीस सतर्क आहेत. स्थानिक गुन्हे शाखा आणि पुसद ग्रामीण पोलीस ठाण्याच्या पथकांनी १४ डिसेंबर रोजी वेगवेगळ्या दोन कारवाईत एकूण १०.०७१ किलो गांजा जप्त केला. यासह चारचाकी वाहन, दुचाकी आणि मोबाईल असा सुमारे ७ लाख ७१ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, पाच आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे.

पहिल्या कारवाईत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गोपनीय माहिती मिळाली की, सैयद राहत अली उर्फ टकल्या सैयद अमजत अली (वय ५४, रा. सुराना ले-आऊट, यवतमाळ) हा आपल्या साथीदारांसह नागपूरवरून चारचाकी वाहनातून कळंब मार्गे यवतमाळला गांजा विक्रीसाठी घेऊन येत आहे. या माहितीवरून पथकाने नरसापूर बसस्टॉपजवळ सापळा लावला. रात्री ११ वाजता निळ्या



रंगाची स्विफ्ट कार (क्र. एमएच २० बीएफ ८०२९) येताच ती थांबवली. वाहनातील श्रावन हरिदास फुलमाळी (वय २७), प्रितमसिंग दामोधर रामटेके (वय ४०, दोन्ही रा. अशोक नगर, यवतमाळ) आणि सैयद राहत अली अशी तिघांची नावे समोर आली. पंचांसमोर झडती घेतली असता सैयद राहत अलीच्या मांडीवरील लाल रंगाच्या बॅगेत ८.०३० किलो (किंमत १ लाख ६० हजार ६०० रुपये) गांजा आढळला. यासह तीन मोबाईल, चारचाकी वाहनासह एकूण ६ लाख ९१ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी कळंब पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

दुसऱ्या कारवाईत पुसद ग्रामीण पोलीस ठाण्याच्या दंगल नियंत्रण पथकाला माहिती मिळाली की, दोन इसम दुचाकीवरून पुसदकडून दिग्रसकडे गांजा घेऊन जात आहेत. या माहितीवरून संध्याकाळी ७.३० वाजता धुंदी परिसरात सापळा लावण्यात आला. दुचाकी येताच ती थांबवली असता शेख इसराईल उर्फ शेख वसीम शेख ईस्माईल (वय ३२, रा. संभाजी नगर, दिग्रस) आणि एजाज निजाम नौरंगाबादे (वय ३२, रा. गवळीपुरा, दिग्रस) अशी नावे समोर आली. पंचांसमक्ष झडतीत नायलॉन पिशवीत २.०४१ किलो (किंमत ५० हजार रुपये) गांजा आढळला. गांजा आणि दुचाकीसह ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी पुसद ग्रामीण पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्यांतर्गत गुन्हा दाखल झाला. या दोन्ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमंत गायकवाड (उमरखेड, पुसद प्रभार) यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतिश चवरे, सपोनि मनिष गावंडे, पोउपनि गजानन राजमल्लु यांच्यासह सै. साजीद, योगेश गटलेवार, अजय डोळे, रुपेश पाली, योगेश डगवार, प्रशांत हेडाऊ, रितुराज मेढवे, सुनिल पैठणे, आकाश सहारे, देवेंद्र होले, आकाश सुर्यवंशी; तसेच पुसद ग्रामीण ठाणेदार सपोनि सुरेंद्र राऊत, पोउपनि राहुल देशमुख, श्रेणी पोउपनि कैलास ससाणे, पोलीस अंमलदार रविंद्र गावंडे, आरसीपी पथकातील अभिजीत सांगळे, संतोष सरकुंडे, अविनाश कदम, सुनिल चिरमाडे यांच्या पथकांनी पार पाडल्या.

## पारवा येथील जि.प.कन्या शाळेत आनंद मेळावा

प्रतिनिधी १६ डिसेंबर

■ **पारवा** : येथील जिल्हा परिषद कन्या शाळेत विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासासाठी आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात शाळेतील विद्यार्थिनींनी आपल्या घरून तयार करून आणलेले विविध खाद्यपदार्थ विक्रीसाठी ठेवले होते.

मेळाव्यात समोसा, आलुबोंडा, दहिवडे, पोहे, कच्चा चिवडा आदी चविष्ट पदार्थांचे स्टॉल लावण्यात आले होते. विद्यार्थिनींनी स्वतः पुढाकार घेऊन विक्री केली. यामुळे त्यांच्यात आत्मविश्वास, व्यवहारज्ञान व उद्योजकतेचे धडे मिळाल्याचे चित्र दिसून आले.

या कार्यक्रमास कन्या शाळेच्या मुख्याध्यापिका दीपिका गीता राजू चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्यासोबत शाळेतील सहशिक्षकवर्ग उपस्थित होता. शाळेतील सर्व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. तसेच पालकवर्गानेही मेळाव्यास उपस्थित राहून विद्यार्थिनींचे कौतुक केले.

आनंद मेळाव्यामुळे शाळेतील वातावरण उत्साहपूर्ण झाले असून विद्यार्थिनींच्या कलागुणांना व कौशल्यांना वाव मिळाली आहे.



## मृत्यूला हरवून पुन्हा उभा राहिला आमीर शेख

प्रतिनिधी १६ डिसेंबर

**उमरखेड** : मृत्यूच्या दारावर पोहचलेल्या २५ वर्षीय आमीर शेखचे जीवन पुन्हा चालत चालण्याजोगे झाले आहे. ऑक्टोबरच्या भीषण अपघातात डोक्यात गंभीर दुखापत, मेंदूत रक्तस्त्राव, यकृत, पोटावर जखमा, छातीवरील गंभीर जखमा झाल्याने परिस्थिती अत्यंत नाजूक झाली होती. अत्यंत गंभीर अवस्थेत रुग्णालयात दाखल झाल्यावरही श्वसनसंबंधी अडचणीमुळे व्हेंटिलेटरवर ठेवावे लागले होते. शरीर निश्चल, बाहुल्यांत कंपन नातेवाईकांची आशा हळूहळू कमी होत चालली होती. परंतु डॉक्टरांच्या प्रयत्नांनी हार मानली



नाही. श्वसननलिका स्वच्छ करणे, योग्य औषधोपचार आणि सातत्याने मॉनिटरिंग दररोजच्या मेहनतीनंतर हळूहळू सुधारणा दिसू लागली. दोन आठवड्यांच्या अथक प्रयत्नांनंतर व्हेंटिलेटरवरून तो मुक्त झाला व पुनर्वसनाची प्रक्रिया सुरू झाली. शेवटी, आमीर स्वतःच्या पायांनी चालत रुग्णालयात डॉक्टरांना भेटायला आला. नातेवाईक आणि डॉक्टरांचे डोळे आनंदाश्रूंनी भरले. या प्रसंगाने सिद्ध झाले की, वैद्यकीय प्रयत्न, नातेवाईकांचा विश्वास आणि रुग्णाची जिद्द एकत्र येऊन चमत्कार घडवू शकतात. डॉ मयुरेश रामपुरकर यांनी सांगितले, “डॉक्टर प्रयत्न करतो, पण त्या प्रयत्नांना यश देणारा ईश्वर असतो.” ही घटना फक्त वैद्यकीय उपचाराची नाही, तर मानवी जिद्दी, श्रद्धा आणि जीवनावरचा विश्वास यांची प्रेरणादायी कथा आहे. आमीर शेख पुन्हा जीवनाकडे चालत आले हा संदेश प्रत्येकासाठी धैर्य व आशेचा आहे.

## नागेशवाडी स्मशानभूमीवर विवाद; गावकऱ्यांनी एसडीओ कार्यालयात धडक

प्रतिनिधी १६ डिसेंबर

**उमरखेड** : नागेशवाडी गावातील स्मशानभूमीवरील २० गुंठे जमीन नायब तहसिलदारांनी एका शेतकऱ्याच्या नावावर नोंद केल्याने गावकऱ्यांमध्ये रोष पसरला आहे. नागेशवाडीतील ही जमीन सन 1950-51 पासून स्मशानभूमीसाठी राखीव होती. मूळ मालक सुगंधाबाई धनाजी व लीलावती तुकाराम बाभळे यांच्या पूर्वजांनी ही जमीन गावासाठी दिली होती.

सन 1995 मध्ये जमीन विक्री होत असताना स्मशानभूमीची २० आर जमीन वगळण्यात आली होती.



त्यानंतरही 1998 आणि 2008 मध्ये झालेल्या खरेदी-विक्रीमध्ये ही जमीन कायम राखीव राहिली. मात्र, नायब तहसिलदार विश्वंभर राणे यांनी १८ जुलै २०२५ रोजी धनाजी व गजानन तुकाराम बाभळे यांच्या नावावर चुकीचा आदेश पारित केला. यामुळे गावकऱ्यांना मयताच्या अंत्यसंस्कारासाठी जागा उपलब्ध होणार की नाही, हा प्रश्न उभा राहिला आहे.

गावकऱ्यांनी उपविभागीय अधिकारी उमरखेड यांच्याकडे निवेदन देऊन तात्काळ हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे. सरपंच प्रियंका जटाळे, उपसरपंच सीमा सुरोशे, ग्रामपंचायत सचिव श्रीमती एस.एस. भांडवले व इतर गावकऱ्यांनीही यावर आपली चिंता व्यक्त केली आहे. गावकऱ्यांचा आरोप आहे की, नायब तहसिलदाराने संपूर्ण अभिलेख न तपासता आणि मुक्का पाहणी न करता आदेश पारित केला. त्यामुळे काही व्यक्ती स्मशानभूमीवर ताबा घेऊन गावकऱ्यांना अंत्यसंस्कार करण्यास अडथळा आणू शकतात.उपविभागीय अधिकारी उमरखेड यांनी स्पष्ट केले की, स्मशानभूमीवर पुढील आदेशापर्यंत कोणताही अडथळा निर्माण होऊ नये आणि प्रकरण नियमानुसार तपासले जाईल. गावकऱ्यांना आशा आहे की तात्काळ हस्तक्षेप करून आदेश रद्द केले जाईल आणि त्यांच्या धार्मिक व सामाजिक हक्काचे संरक्षण होईल.सदर प्रकरण गावकऱ्यांसाठी संवेदनशील असून प्रशासनाच्या तत्पर कारवाईची आवश्यकता आहे.

## २६ क्षेत्रीय अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस

प्रतिनिधी १६ डिसेंबर

**यवतमाळ** : वीज बिल वसुलीत होत असलेला निष्काळजीपणा सहन न करता महावितरण अमरावती परिमंडळाने कडक भूमिका घेतली आहे. नोव्हेंबर महिन्याच्या वीज बिल डिमांडची अपेक्षित वसुली न झाल्याने एकूण ३१ अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे. यामध्ये ५ अधिकाऱ्यांच्या पगारातून एक तृतियांश रक्कम कपात, तर २६ क्षेत्रीय अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

महावितरणचे मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी स्पष्ट केले की, जबाबदारीतील निष्काळजीपणा अजिबात खपवून घेतला जाणार नाही. वीज बिल वसुली आणि ग्राहकांना नियमित व दर्जेदार वीज सेवा देणे हे सर्वोच्च प्राधान्य आहे. अमरावती परिमंडळात घरगुती, वाणिज्यिक, औद्योगिक, पथदिवे, पाणीपुरवठा आदी सर्व वर्गवारीतील ग्राहकांकडून ९०६ कोटी रुपयांची वसुली अपेक्षित होती. यामध्ये यवतमाळ जिल्ह्यात ५३६ कोटी ५२ लाख रुपयांची थकबाकी होती. नोव्हेंबर महिन्यात अमरावती जिल्ह्यात ८९ कोटी ७६ लाख, तर यवतमाळ जिल्ह्यात ५५ कोटी ६९ लाख रुपये वसूल झाले. तरीही एकूण ७५५ कोटी रुपयांची थकबाकी शिल्लक आहे.

### जाहीरनामा

याद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की अर्जदार शामराव रामराव वाघमारे रा.वेणी बु.तालुका महागाव यांचा मुलगा नामे धनंजय शामराव वाघमारे यांचा जन्म दिनांक 07/01/2002 रोजी झाला आहे.

परंतु त्यांच्या जन्माची नोंद सचिव ग्रामपंचायत वेणी बु.तालुका महागाव येथे नसल्यामुळे महाराष्ट्र जन्म नोंदणी अधिनियम कलम 13 3 नुसार ग्रामपंचायत वेणी बु. येथे घेण्याकरिता महागाव तहसील कार्यालयात जन्माची नोंद आदेशित घेण्याबाबत प्रकरण तहसील कार्यालय सादर केले आहे.

या जाहीरनामा बाबत कोणाचा काही आक्षेप असेल तर त्यांनी आपले अक्षेप लेखी कार्यालयास सादर करावेत. मुदतीनंतर येणाऱ्या अक्षेपाचा कोणताही विचार केला जाणार नाही याची आक्षेप घेणाऱ्यांनी नोंद घ्यावी.

**स्वा./-**
**तहसीलदार, महागांव**

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

मंगळवार दि. १६ डिसेंबर २०२५



## न.प.निवडणुकीत ...

# विजयाचे बिघडले नियोजन, पक्षांचे गटा - तटात विभाजन !

## कोण साधणार नेम, कोण करणार गेम, वरवर दिखावा सेम

### मोठ्या पक्षाची राजकीय खेळी... चांगल्या मानसाचा घेवू नका बळी

नेम साधून गेम करण्यात तत्पर असलेलया मोठ्या पक्षात वरवर जरी सेम वाटत असले तरी चांगल्या मानसाचा गेम करण्याच्या तयारीत आहेत. मोठ्या पक्षातील सोबत असलेले व नाराज असलेले दोन्ही गट राजकीय खेळी करून बळी घेण्याच्या मार्गावर आहेत. एकतर त्यांच्याकडे चांगला उमेदवार नव्हता, चांगला उमेदवार मिळाला तो आपल्याला निवडूण आल्यावर अडचणीचा ठरू शकतो. त्यामुळे चांगल्या मानसाचा बळी घेण्याच्या तयारीत या अगोदरचे मोठ्या पक्षातील नाराज झालेले व भ्रष्टाचारी नेते आहेत.






● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

गुलाबी थंडीत वाशीम शहरातील नगर पालिका निवडणुकीचे वातावरण चांगलेच तपायला सुरूवात झाली. तर ऐकेरी दुहेरी वाटणार लढत तिहेरी होत आहे. तर अनेक ठिकाणी काट्याची टक्कर होणार असून कोणाला चक्कर येणार आहे. हे २१ तारखेला कळणार आहे. वाशीममध्ये उबाठा शिवसेनेच्या रेखा सुरेश मापारी, भाजपाचे अनिल केंद, आमआदमी पार्टीचे सागर कोकास, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे संदिप दहात्रे, वंचितचे वैभव उल्लेमाले हे मैदानात उतरले आहेत. मतदानाला तीन दिवस शिल्लक असतांना पक्षातील गटा -तटाचे विभाजन निवडणुकीचे नियोजन बिघडवीत आहे. राजकारणात कोण कोणाचा नेम साधणार कोण कोणाचा गेम करणार हे काळच ठरविणार आहे. वरवर जरी सेम दिसत असले तरीही मोठ्या पक्षाचे भ्रष्ट नेते चांगल्या मानसाचा गेम करण्याच्या तयारीत आहेत.

पुरोगामी मनविणाऱ्या महाराष्ट्रात आजही सत्तेची समिकरणे जाती-जमातीच्या खुंट्याला बांधल्या गेली आहे. सत्तेच्या सारीपाटावर विशेषत: निवडणुकीच्या संदर्भात कास्ट फॅक्टर हा महत्वाचा समजल्या जातो, विकासाचे मुद्दे केव्हाचे हद्दपार झाले आहेत. जातीच्या आधारेच उमेदवाऱ्या दिल्या जात आहेत. त्यानुसार खेळीही राजकीय पक्ष खेळत आहेत. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत सत्ताधारी महायुती आणि विरोधी महाविकास आघाडी यांच्यात थेट संघर्षासोबतच आघाडीची बिघाडी झाली. महायुतीची घडी बिघडली. युतीतीलही साथी सोबत नाही. सर्वच पक्षात गटातटात विभाजन झाले. त्या विभाजनामुळे विजयाचे नियोजन बिघडले आहे. उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी अनेकांनी या पक्षातून त्या पक्षात उड्या मारल्या. तर अनेकांना उमेदवारी न मिळाल्याने अपक्ष रिंगणात उतरले आहेत. अनेक उमेदवार पक्ष बदलत असतांना सत्तेसाठी नितीमत्ता गहान ठेवत असल्याचे चित्र निर्माण झाले होते.

राजकारणात सत्ता महान असून या निवडणुकीत पुन्हा एकदा जातीय समिकरणच समोर येतांना दिसत आहे. विकासाचे मुद्दे हद्दपार झाले आहे, शहर भकास झाले आहे. पैशातून सत्ता आणि सत्तेतून पैसा या समिकरणावर राजकारण सुरू आहे. सत्तेसाठी मात्र, तडजोडीतून कुरघोडी करतांना उमेदवार दिसत आहे. जागा वाटपावरून निवडणुकीच्या खऱ्या रणसंग्रामाला सुरूवात झाली आहे.श्रेयवादाच्या व कुरघोडीच्या राजकारणात खऱ्या कार्यकर्त्यांचा मात्र, बळी दिल्या जात असल्याचे चित्र सर्वच पक्षात निर्माण झाले आहे. वरवर ऐकेरी वाटणारी निवडणूक दुहेरी तिहेरी झाली आहे. केवळ दोन दिवस मतदानाला शिल्लक असतांना निवडणुकीत चूरस वाढली आहे. कोण सरस ठरणार, काट्याची टक्कर होणार कोणाला चक्कर येणार याकडे लक्ष लागले आहे.

### निवडणुकीत वाढली चूरस, कोण ठरणार सरस ...

जातीच्या समिकरणावर आकडे मोड करणाऱ्या उमेदवारांना आता आमआदमी पक्षाचे उमेदवार सागर कोकास यांनी विकासाच्या मुद्यावर हात घालून चूरस निर्माण केली आहे. सर्वच उमेदवार जातीच्या आधारेच निवडणूक रिंगणात उतरले आहेत. अनेक उमेदवारांनी त्यांचा आतापर्यंत त्यांचा विकासाचा जाहीर नामा प्रसिध्द केला नाही. तर सागर कोकास यांनी स्टॅप पेपरवर वचननामा लिहून देवून हे कामे करणार नाहीतर राजीनामा देणार असा करारच केला. शिवाय मुख्यमंत्री रोज या शहराचा विकास करा या आंदोलनामुळे ते मतदारांपर्यंत थेट पोहचले. युवकांच्या गळयातले ताईत बनले. विकासाचा मुद्दा घेवून थेट रस्त्यावर उतरणारे एकमेव उमेदवार म्हणून सागर कोकास सरस ठरत आहेत. जातीवादावर मात्र चूरस होत आहे.




## थोडक्यात



### ज्योतीताई गावंडे यांचे दिर्घ आजाराने निधन

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

मंगरूळपीर . बाळासाहेब ठाकरे सभागृह वार्ड क्र. १ मधील सामाजिक कार्यकर्ते तथा गावडे परिवाराचे आधारवड श्री विठ्ठलराव गावंडे यांच्या सुनबाई ज्योतीताई नंदकिशोर गावंडे ४ डिसेंबर रोजी दीर्घ आजाराने निधन झाले त्यांच्या पश्चात मुलं सुना नातू सू-सासऱ्यासह फार मोठा परिवार त्या परिवारातील सर्वांना एकरूप करून आपलं आपलेसे वाटणाऱ्या ज्योतीताईची ज्योत मालवली गावंडे परिवारावर शोक काळा पसरली त्यांना दुःखातून सावरण्याची शक्ती प्रदान होण्यासाठी मनोमन प्रार्थना केली. ज्योतीताई नंदकिशोर गावंडे यांनी आपल्या कुटुंबाच्या जडणघडणमध्ये एकरूप राहण्यासाठी सदैव प्रयत्न केले आज त्यांचा तेरावा दिवस या दिवशी सुद्धा गावंडे परिवार शोकाकुल आहे त्यांना या दुःखातून सावरण्यासाठी पुन्हा ईश्वर बळ देवो .

## युवकांनी, व्यवसायाकडे वळण्याची गरज - माजी आ.विजयराव जाधव





● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

जागतिक पातळीवरील अस्थिर वातावरण आणि विविध क्षेत्रातील सध्याची स्पर्धा लक्षात घेता , मराठा समाजातील युवकांनी नोकरीच्या मागे लागुन अधिक वेळ घालविण्यापेक्षा उद्योग - व्यवसायाकडे वळावे . असे आवाहन माजी आ . विजयराव जाधव यांनी केले . स्थानिक वाटाणे लॉन परिसरातील मराठा समाज सेवा मंडळाच्या कार्यालयात आयोजित दिनदर्शिकेच्या विमोचन सोहळ्यात अध्यक्षपदावरून ते बोलत होते .यावेळी ज्येष्ठ समाजसेवक माणिकराव जोगदंड , वाशीम बाजार समितीचे सभापती महादेवराव काकडे गुरुजी , मंडळाचे कार्याध्यक्ष तानाजी कवर , गुलाबराव जाधव , इंजिनिअर अशोकराव बुंधे , ॲड . सुरेश टेकाळे , साहेबराव मापारी , ज्ञानेश्वर वाघ , दिनकर बोडखे यांची प्रमुख उपस्थिती होती . माजी आमदार जाधव पुढे म्हणाले की, कुठलाही व्यवसाय हा लहान किंवा मोठा नसतो मात्र , त्या व्यवसायाची सुरुवात होणे महत्वाचे आहे . व्यवसायात जिद्द आणि मेहनती बरोबरच विश्वासार्हता राखली तर हमखास यश मिळते . हे त्यांनी उदाहरणांवरून स्पष्ट केले . यासाठी मराठा समाजातील काही धुरीनांनी समोर येवून युवकांना योग्य मार्गदर्शन आणि सहकार्य करावे . असे आवाहनही त्यांनी यावेळी केले . दरम्यान , मराठा समाज सेवा मंडळाच्या दिनदर्शिकेचे विमोचन यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा . रघूनाथ पाटील उखळे यांनी केले . कार्यक्रमास प्रा . तुकाराम शेवाळे , तुळशीराम आरू, पंढरी आरु , बालाजी मुळे , धनंजय चव्हाण , किशोर ईढोळे , सदार पाटील , राम जाधव , सौ . वृषाली टेकाळे , ज्योतीताई खोडे , नंदाताई गोटे , रमेश गोटे , रतन पाटील भिसे , गजाननराव शिंदे , सागर गोरे , अमोल वाकुडकर यांच्यासह मराठा समाजातील ज्येष्ठ नागरिक तथा युवकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती .

## महाविस्तार एआय ॲप वापरात मेडशी अव्वल !

### कृषी सहायक व प्रगतशील शेतकऱ्यांचा गौरव



● सिटी न्युज ब्युरो @ मेडशी ●

आधुनिकरणाच्या युगात शेती क्षेत्रही झपाट्याने डिजिटल होत असून, शेतकऱ्यांना तंत्रज्ञानाची जोड देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या वतीने महाविस्तार एआय या महत्त्वाकांक्षी ॲपची निर्मिती करण्यात आली आहे. या ॲपच्या माध्यमातून राज्यातील शेतकरी बांधवांना शेतीविषयक सर्व आवश्यक माहिती मोबाईलवर सहज उपलब्ध होत आहे. परिणामी, पारंपरिक शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची दिशा मिळत असून शेतकऱ्यांचा प्रतिसाद दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे.

महाविस्तार एआय ॲपमध्ये शेती कशी करावी, पीकनिहाय मार्गदर्शन, हवामानाचा अचूक अंदाज, खतांचा योग्य वापर, रोग-किडींची माहिती आदी बाबी सविस्तरपणे देण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे, शेतकऱ्यांच्या प्रश्नांना त्वरित उत्तरे देणारी चॅटबॉक्स सुविधा या ॲपचे वैशिष्ट्य ठरत आहे. यामुळे शेतकऱ्यांना कृषी तज्ज्ञांपर्यंत थेट संवादाची संधी मिळत असून, शेतीतील अडचणी तत्काळ सोडविण्यास मदत होत आहे.या उपक्रमाचा प्रसार व प्रभाव वाढविण्यासाठी वाशिम जिल्ह्यात विशेष स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

ज्या गावातील सर्वाधिक शेतकऱ्यांनी महाविस्तार ॲप डाऊनलोड करून त्याचा प्रभावी वापर केला, त्या गावाचा सन्मान करण्यात येणार होता. या स्पर्धेत वाशिम जिल्ह्यातील मेडशी गावाने आघाडी घेत सर्वाधिक ॲप डाऊनलोड व वापर करत उल्लेखनीय कामगिरी केली.

या यशाबद्दल मेडशी गावाचे कृषी सहायक डी. के. रणवीर तसेच प्रगतशील शेतकरी अजिंक्य मेडशीकर यांचा प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. हा सन्मान उपजिल्हाधिकारी व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.या कार्यक्रमास विश्वनाथ घुगे (निवासी जिल्हाधिकारी, वाशिम), आरिफ शहा (जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, वाशिम), संतोष वाळके (उपविभागीय कृषी अधिकारी, वाशिम), अनिसा महाबळे (प्रकल्प संचालक, आत्मा वाशिम), डॉ. भरत गीते (कृषी संशोधन केंद्र, वाशिम), डॉ. राजेश डवरे (कीटकशास्त्रज्ञ, कृषी विज्ञान केंद्र, वाशिम), कु. हिना शेख (कृषी उपसंचालक, वाशिम), कैलास देवकर (तालुका कृषी अधिकारी, मालेगाव) यांच्यासह कृषी विभागातील अधिकारी-कर्मचारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाविस्तार एआय ॲपमुळे शेती अधिक शास्त्रशुद्ध, नफा देणारी व तंत्रज्ञानाधिष्ठित होत असून, मेडशी गावाने डिजिटल शेतीच्या दिशेने उचललेले पाऊल इतर गावांसाठी प्रेरणादायी ठरत असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

# फसव्या लग्नाचे प्रकरण, वरपित्याचे अपहरण !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

रिसोड तालुक्यातील मोप रस्त्यावर स्विफ्ट डिझायर कारला अडवून प्रवाशांना बेदम मारहाण करत २२ हजार रुपये लुटल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली असून, प्राथमिकदृष्ट्या दरोडा वाटणारे हे प्रकरण प्रत्यक्षात नवरीच्या पलायनाच्या संशयातून घडलेले अपहरण व दहशतीचे गंभीर सत्र असल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे. वाशिम पोलिस दलांनी काही तासांत या गुन्ह्याचा शोध लाऊन आरोपीना जेरबंद केल्याने जिल्ह्यात मोठी चचर्चा सुरू झाली आहे.

नांदेड येथील रहिवासी असलेले एक कुटुंब उपचारासाठी जात असताना, मोप गावाजवळ तीन अज्ञात चारचाकी वाहनांनी त्यांच्या कारला अडवले. आरोपींनी कारमधील प्रवाशांना जबर मारहाण करून २२ हजार रुपये हिसकावून घेतले. घटनेची माहिती मिळताच वाशिम जिल्हा पोलीस अधीक्षक अनुज तारे यांच्या आदेशानुसार वाशिम नियंत्रण कक्ष, स्थानिक गुन्हे शाखा व रिसोड पोलीस स्टेशनचे पथक तातडीने घटनास्थळी धाव घेतली तपासादरम्यान धक्कादायक माहिती समोर आली. आरोपींनी पुढे मोहजा (ता. रिसोड) येथील घरात घुसून नवरी मुलगी न मिळाल्याने मोठ्या प्रमाणात तोडफोड केली. यानंतर वरपक्षातील दीपक खानझोडे याला फोन करून, 'मुलगी आणून दे, नाहीतर अपहरण केलेल्या सीताराम खानझोडे यांना जिवंत ठेवणार नाही,' अशी थेट धमकी देण्यात आली. त्यानंतर आरोपी जालनाकडे पसार झाले.

घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी अहिल्यानगर (अहमदनगर), संभाजीनगर व जालना जिल्ह्यात समन्वयाने शोधमोहीम राबवली. अखेर अपहरण करण्यात आलेले सीताराम खानझोडे यांना अहिल्यानगर येथून सुखरूप मुक्त करण्यात आले.

### गुंतागुंतीच्या प्रकरणात पोलिसांची कौतुकास्पद कामगिरी




पोलिस तपासात उघड झालेल्या माहितीनुसार, दिनांक १० डिसेंबर २०२५ रोजी आसेगांवपेन (जि. वाशिम) येथील दीपक सीताराम खानझोडे यांचा विवाह संभाजीनगर येथील राधा तुपे या मुलीशी झाला होता. या विवाहासाठी मध्यस्थांना तब्बल दोन लाख रुपये देण्यात आले होते. मात्र, लग्नानंतर नवरी पळून जाण्याच्या तयारीत असल्याची माहिती वरपक्षाला मिळाल्यानंतर हा संपूर्ण थरारक प्रकार घडल्याचे स्पष्ट झाले आहे.

### आरोपी नवरी, दलाल ताब्यात

या प्रकरणात दरोडा व अपहरण करणाऱ्या टोळीतील राहुल दिलीप म्हस्के (वय ३२, रा. नागेवाडी, जि. जालना) सतिष विनायक जाधव (वय २९, रा. जालना) यांना अहिल्यानगर येथून अटक करण्यात आली. तसेच आकाश छगन गायकवाड याला जालना येथून ताब्यात घेण्यात आले. या प्रकरणातील मुख्य आरोपी असलेली नवरी मुलगी व विवाहाचा मध्यस्थ शांताराम कडुजी खराटे (रा. मोहजा ) यांनाही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

### पोलिसांची उलखनीय कामगिरी

अपर पोलीस अधीक्षक लता फड, उपविभागीय पोलीस अधिकारी नवदीप अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रदीप परदेशी, रामेश्वर चव्हाण तसेच स्थानिक गुन्हे शाखा व रिसोड पोलीस स्टेशनच्या पथकाने ही उल्लेखनीय कामगिरी बजावली. उर्वरित आरोपर्षीचा कसून शोध सुरू असून पुढील तपास पोउपनि. शिवचरण डोंगरे करत आहेत. या प्रकरणी रिसोड पोलीस स्टेशन येथे अप.क्र. ९८०/२५ व अप.क्र. ९८१/२५ अंतर्गत भारतीय न्याय संहितेतील दरोडा, अपहरण, मारहाण, धमकी व तोडफोडीच्या गंभीर कलमांखाली गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
मंगळवार, दि. १६ डिसेंबर २०२५

# विदर्भ चेंबरची विटेक्स प्रदर्शनी व्यापार उद्योगाला नवी संधी

प्रतिनिधी १६ डिसेंबर

◆ २ ते ५ जानेवारी दरम्यान गोरक्षण संस्थान ग्राऊंडवर भव्य आयोजन



**अकोला :** विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री, अकोलाच्या वतीने आयोजित, मुख्य प्रायोजक मार्वल ट्रिनीटी रियल एस्टेट एलएलपी व सहप्रायोजक विठ्ठल ऑईल असलेली विटेक्स-२०२६ ही भव्य व्यापार व उद्योग प्रदर्शनी २, ३, ४ व ५ जानेवारी २०२६ रोजी गोरक्षण रोड येथील गोरक्षण संस्थान ग्राउंड येथे संपन्न होणार आहे.

या चार दिवसीय प्रदर्शनीत १८० पेक्षा अधिक आकर्षक स्टॉल्स असणार असून, पश्चिम विदर्भातील लघु व मध्यम उ?द्योग, व्यापारी, सेवा प्रदाते, स्टार्ट-अप्स यांना आपल्या उत्कृष्ट उत्पादनांचे व सेवांचे प्रदर्शन व विक्री करण्याची सुवर्णसंधी उपलब्ध होणार आहे. सकाळी १० ते रात्री १० वाजेपर्यंत सर्व नागरिकांसाठी खुली असलेली ही प्रदर्शनी अकोलकरांसाठी मोठी पर्वणी ठरेल, अशी माहिती विदर्भ चेंबरचे अध्यक्ष निकेश गुप्ता यांनी दिली. सोमवारी चेंबर कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत यासंबंधी माहिती देण्यात आली. यावेळी चेंबरचे मानद सचिव निरव वोरा, वरिष्ठ उपाध्यक्ष सिद्धार्थ रुहाटीया, कनिष्ठ उपाध्यक्ष निखिल अग्रवाल, कोषाध्यक्ष किशोर बाछुका, सहसचिव किरीट मंत्री, सहसंयोजक राहुल मित्तल आदी मान्यवर उपस्थित होते. विटेक्स-२०२६ चा मुख्य उद्देश पश्चिम विदर्भातील व्यापार, उ?द्योग व उ?द्योजकतेला गती देणे, स्वदेशी, मेक इन इंडिया व वोकल फॉर लोकल या संकल्पनांना प्रोत्साहन देणे, रोजगार निर्मितीला चालना देणे तसेच अकोला जिल्ह्याला एक विकसित व्यापारी केंद्र म्हणून अधोरेखित करणे हा आहे. हे आयोजन प्रादेशिक एमएसएमईएस, स्टार्ट-अप्स, एग्रो-प्रोसेसिंग युनिट्स व स्थानिक उत्पादनांना व्यापक बाजारपेठ उपलब्ध करून देणारे प्रभावी व्यासपीठ ठरणार आहे. या प्रदर्शनीत एकाच छताखाली विविध प्रकारची उत्पादने व सेवा उपलब्ध राहणार आहे.

सोलर पॅनल्स व फिटिंग्स, फर्निचर, गृहोपयोगी साहित्य, होम डेकोर व इंटिरियर डिझाइनिंग, गिफ्ट आयटम्स, डिझायनर वस्त्र, ऑटोमोबाईल्स, स्पोर्ट्स व फिटनेस, रोबोटिक्स, वेलनेस सेक्टर, वॉटर ट्रीटमेंट सोल्यूशन्स, एग्रो प्रोसेसिंग मशिनरी, डेअरी उत्पादने, प्री-फॅब्रिकेटेड स्ट्रक्चर्स, बँकिंग व फायनान्स सेवा, करिअर गाईडन्स, गृहबांधणी, अकाउंटिंग सॉफ्टवेअर, ऑर्गेनिक उत्पादने, मोरिंगा व हर्बल प्रॉडक्ट्स, फायर सेफ्टी व सेफ्टी इक्विपमेंट्स यांचा समावेश असेल.

तसेच सामाजिक व आध्यात्मिक क्षेत्रासाठी एक विशेष विभाग ठेवण्यात आला आहे. त्यामध्ये इस्कॉन, सनातन धर्म सभा पुस्तकालय, आर्ट ऑफ लिविंग यासारख्या संस्थांचा सहभाग राहणार आहे. संपूर्ण कुटुंबासाठी उपयुक्त असलेल्या या प्रदर्शनीत विविध खाद्य पदार्थांनी नटलेला विशेष फूड झोन, मोफत व विशाल पार्किंग सुविधा उपलब्ध राहणार असून, सुमारे दीड लाखांहून अधिक प्रेक्षक भेट देतील, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. प्रदर्शनी यशस्वी करण्यासाठी उपसमित्या गठीत केल्या आहेत. चार दिवसीय प्रदर्शनीचा लाभ घ्यावा असे आवाहन केले आहे.

# भाजप बंडखोरांची डोकेदूखी घातक

प्रतिनिधी १६ डिसेंबर

◆ हरिश आलिमचंदानी यांच्या पॅनलची जुळवाजुळव सुरु

**अकोला :** महापालिका निवडणुकीसाठी सर्वाधिक इच्छूक भाजप मध्ये आहे. ८० जागांसाठी बाराशे अर्ज आल्याचा दावा भाजपने केला आहे. स्थानिक निवडणुकीत जितके जास्त दावेदार तितकी जास्त डोकेदूखी राजकीय पक्षासाठी असते. विधानसभा निवडणुकीत भाजप मध्ये झालेल्या बंडखोरीने अकोला पश्चिम हा भाजपच गढ ढासळला होता. त्यामुळे अकोल्यातील भाजप नेत्यांनी बंडखोरांना पक्षातून हद्दपार केले. बंडखोरांना वंचित चा सहारा आहे. पण, त्यापेक्षा बंडखोर हे हरिश आलिमचंदानी यांच्या महानगर लोककल्याण किंवा मित्र समाज आघाडीकडे वळण्याची चिन्हं आहे. या विषयावर आज समविचारी नेत्यांची बैठक बंधन लॉन येथे आहे. या लॉनमधल्या घडामोडींवर भाजप वरिष्ठांचे लक्ष राहणार आहे.

महापालिका निवडणुकीत अशा पॅनलच्या माध्यमातून मतांचे विभाजन झाले तर याचा सर्वाधिक फटका हा भाजपला बसण्याची चिन्हं आहे. भाजप नेत्यांनी देखील तिकिट नाकारले तर बंडखोरी करणार का, हा प्रश्न इच्छूकांना विचारल्याने बंडखोरांची काळजी भाजपाने घेणे सुरु केले आहे. अशा परिस्थितीत भाजपाचा प्रभाव असलेल्या पन्नास जागांवर भाजप बंडखोरांना हरिश आलिमचंदानी यांच्या पॅनलने जुळवून घेतले आणि त्यांनी मतांचा खड्डा पाडला तर अकोल्यात वेगळे चित्र निर्माण होण्याची शक्यता राजकीय पातळीवर चर्चिली जात आहे.



स्व. विनयकुमार पाराशर यांच्या पावलावर पाऊल ठेवत हरिश आलिमचंदानी हे राजकीय कारकिर्द सुरु ठेवू पाहत आहे. माजी नगराध्यक्ष असलेले हरिश आलिमचंदानी हे हाडाचे कार्यकर्ते आहे आणि स्वच्छ चारित्र्यामुळे जनमानसात त्यांचा तितकाच प्रभाव आहे. भ्रष्टाचाराचा कुठलाही आरोप त्यांच्यावर नाही. त्याच बरोबर महापालिकेतून कमाई करत ती, घरी नेण्याची गरज त्यांना कधी पडली नाही. सिंधी समाजाबरोबर इतर ही समाजात त्यांच्या शब्दाला मान आहे. त्यामुळे हरिश आलिमचंदानी हे महापालिका निवडणुकीत प्रभाव टाकणारे व्यक्तिमत्व नक्की आहे. त्यांची ही ओळख विरोधक ही मान्य करतील.

राज्यात ज्या प्रमाणे इतर बंडखोरांना भाजपने सामावून घेतले त्या प्रमाणे हिंदूत्ववादी विचारधारेचे हरिश आलिमचंदानी यांना देखील भाजप समावून घेऊ शकत होती. पण, अकोला पश्चिम च्या दारुण पराभवाने तसे होण्याची शक्यता धुसर आहे.अशा परिस्थिती हरिश आलिमचंदानी यांनी स्थानिक आघाडी स्थापन करत भाजप बंडखोर व समदुःखी नेत्यांना साथ दिली आणि त्यांचे चार ते पाच नगरसेवक त्यांचे निवडुन आले. तर, सत्ता स्थापन करण्याच्या गणितात त्यांना वगळून चालणार नाही अशी परिस्थिती निर्माण होऊ शकते. एका महिन्यात याचा निकाल लागणार असून मतदानाच्या दिवशी काय हवा निर्माण होते हे कोणीच सांगू शकत नाही. अशा परिस्थितीत हरिश आलिमचंदानी यांच्या नव्या आघाडीच्या विस्तवावर पाणी टाकले जाते की त्याला फुंकर घातली जाते हे पाहण्यासारखे असेल.

लोकशाही मजबूत करणारा... नागरिक संवाद
बोलूया, ऐकूया, बदल घडवूया

# गाविलगडच्या शूरवीरांना शिवतीर्थ प्रतिष्ठानची मानवंदना

वि.प्रतिनिधी १६ डिसेंबर



**अकोट :** गाविलगड किल्ल्यावर पार पडलेल्या द्वितीय मराठा–इंग्रज युद्धातील शूरवीरांच्या स्मरणार्थ शिव स्वराज्य प्रतिष्ठानच्या वतीने १४ डिसेंबर रोजी शौर्यदिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी अकोट येथील शिवतीर्थ प्रतिष्ठानच्या ४५ मावळ्यांनी गाविलगडावर उपस्थित राहून मराठा शूरवीरांना मानवंदना दिली. नागपूरकर रघुजीराजे भोसले यांच्या अधिपत्याखाली असलेल्या गाविलगड किल्ल्यावर ११ ते १५ डिसेंबर १८०३ दरम्यान इंग्रज व मराठ्यांमध्ये द्वितीय घनघोर युद्ध झाले होते. या युद्धात रघुजीराजे भोसले यांचे बंधू व्यंकोजी ऊर्फ मन्या बापू भोसले, गाविलगडचे शूर किल्लेदार बेनीसिंग राजपूत यांच्यासह मोठ्या संख्येने मराठा सैन्य धारातीर्थी पडले. या ऐतिहासिक लढ्याच्या स्मृती जतन करण्यासाठी आणि मराठ्यांच्या शौर्याला नमन करण्यासाठी शिव स्वराज्य प्रतिष्ठानचे शिवा काळे व त्यांची टीम रवाना झाली. यावर्षीही संतोष झामरे यांच्या मार्गदर्शनाखाली इतिहासप्रेमी, शिक्षक, युवक–युवती व शिवप्रेमी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. १४ डिसेंबर रोजी सकाळी ठीक सहा वाजता अकोट येथील छत्रपती शिवाजी चौकातून शिवरायांच्या जयघोषात मोहिमवीर रवाना झाले. सकाळी साडेआठ वाजता हा लवाजमा गाविलगडाच्या पायथ्याशी असलेल्या बागलिंगा गावात पोहोचला. तेथून छत्रपती शिवरायांच्या जयघोषात, पोवाडे व स्फूर्तिगीते गात गड चढाईस प्रारंभ झाला. सुमारे चार तासांच्या अवघड मात्र प्रेरणादायी प्रवासानंतर सुमारे ३०० मोहिमवीर गाविलगडावर दाखल झाले. गडावरील पहिल्याच दरवाज्यात गड–किल्ल्यांचे अभ्यासक विवेक चांदुरकर यांनी अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. आर्किटेक्ट अनंत गावंडे, संतोष झामरे, किशोर वानखडे व शिवा काळे यांच्या मार्गदर्शनामुळे इतिहास केवळ ऐकण्यापुरता न राहता प्रत्यक्ष अनुभवता आला. यानंतर 'गाविलगडची शौर्यगाथा' या पुस्तकाचे विमोचन करण्यात आले. या मोहिमेत संतोष झामरे, प्रवीण सिरस्कार, ज्ञानेश्वर मांडेकर, निळकंठ म्हैसने, अमोल आगे, पियुष सपकाळ, बंडू उकर्डे, श्रीकांत सिरस्कार, डॉ. अभिषेक गावंडे, प्रा. संदीप बोबडे, ज्ञानेश्वर खापरकर, विरेंद्र दांडळे, पवन ठाकुर, मनोज लोडम, रुपेश इंगळे, सुनील पोटे, अक्षय साबळे, नंदकिशोर दाळू, सुशील सहगल, अविष्कार प्रवीण सिरस्कार, अनिल काळे, सौ. नयना सरोद, रणवीर वाघोडे, तृप्ती वाघोडे, दीपक दही, ज्ञानेश्वर माटे, राजेश चित्ते, हर्षल बहादुरे, शंकरराव तायडे, प्रमोद बगले, संदीप सरडे, अशोक मुंडे, बाळासाहेब खोटरे, समृद्धी काळे, निकिता सातारकर, शिवम सातारकर आदींचा सहभाग होता.

# आ.रणधीर सावरकर यांची नानाजी देशमुख कृषी संजीवनी सुकाणू समिती सहअध्यक्षपदी निवड

प्रतिनिधी १६ डिसेंबर



**अकोला :** भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस विधिमंडळ मुख्य प्रतोद आमदार रणधीर सावरकर यांची नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या सुकाणू समितीच्या सह अध्यक्षपदी त्यांची निवड झाली.

शेतकरी शेतमजुरांना न्याय मिळवून देण्यासाठी सदैव आवाज उठवणारे लोकप्रतिनिधी म्हणून आमदार रणधीर सावरकर यांची ख्याती आहे. त्यांच्या निवडीमुळे शेतकऱ्यांच्या मनातली गोष्ट पूर्ण झाली. अकोला पूर्वच्या मतदार तसेच कार्यकर्त्यांमध्ये एक नवचैतन्य निर्माण झाले आहे अनेकांनी आमदार रणधीर सावरकर यांना शुभेच्छा व्यक्त केल्या.

कापूस खरेदी केंद्रांची संख्या सुरुवातीला कमी असल्यामुळे कापुस उत्पादक शेतकऱ्यांची अडचण लक्षात घेवून आ. रणधीर सावरकर यांनी हा विषय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापर्यंत लावून धरला होता. त्यानंतर नाफेडची खरेदी केंद्र वाढविण्यात आली.

**अशी आहे समिती**

◆ सुधारित समितीमध्ये नियोजन, वित्त, सहकार व पणन, कृषी, पदुम, जलसंधारण विभागांचे सचिव, प्रधान सचिव, अपर मुख्य सचिव, कृषी आयुक्त, राज्यातील कृषी विद्यापीठांचे कुलगुरू तसेच नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचे संचालक यांचा समावेश आहे.

# मनपाच्या १४ शिक्षकांना पदस्थापना

प्रतिनिधी १६ डिसेंबर

**अकोला :** मनपा शाळांतील शिक्षकांना देण्यात आलेली तसेच विषय शिक्षक पदी झालेल्या पदोन्नतीचा पाठपुरावा पूर्ण झाला आहे. या प्रक्रियेनंतर शाळांमधील विद्यार्थी उपलब्ध पटसंख्या, जागांचे आणि पुर्नयोजन शिक्षणाच्या दर्जा व गुणवत्ता वाढीच्यादृष्टीने काही शाळांमध्ये शिक्षकांची नव्याने पदस्थापना आवश्यक होती. शिक्षण विभागाने एकूण १४ शिक्षकांना विविध शाळांमध्ये पदस्थापना दिली आहे. शिक्षण विभागातील शिक्षकांना निवड श्रेणीचा लाभ देण्याबाबत ७ नोव्हेंबर रोजी विभागीय पदोन्नती समितीने निर्णय घेतला.

# अकोला महानगर पालिका निवडणूक

**प्रभाग क्रमांक १४, इच्छुक उमेदवार**

**अकोला :** प्रवीण पातोळे शिवनी, पराग गवई, गोपाल मुळे, वशिम खां, राजेश भाऊराव मिरगे शिवनी, पूनम प्रवीण वरणकार, सौ. सुनीताताई सुपोत पातोडे, अनुसुचित जाती महिला प्रवर्ग, प्रवीण वाहूरवाघ, शेख शमसू शेख साबीर, विलास जगताप, विकेश जगताप, संगीता श्याम खंडारे, राजेशनी जगताप.







**प्रभाग १८ मधील इच्छुक उमेदवार**

अकोला महापालिका निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवारांनी देखील तयारी केली आहे. राजकीय पक्षांकडे काहींनी अर्ज दाखल केले आहे. तसेच उमेदवारी मिळाली नाही तर प्रसंगी अपक्ष म्हणून उभे राहण्याची तयारी केली आहे. प्रभाग क्रमांक १८ मध्ये नितीन रामशंकर मिश्रा आणि अर्चना मुदीराज इच्छुक आहेत.










हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK